# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and higher Secondary Education
नागपूर विभागीय मंडळ,सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००१

msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांक:नाविमं/गो.उ.मा. / 3509
नागपूर, दिनांक:31 / 10 / 2023

प्रति,
1. विभागीय शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर
2. शिक्षणाधिकारी (माध्य.)
सर्व जिल्हा परिषद, भंडारा, चंद्रपूर,नागपूर,
वर्धा,गडचिरोली व गोंदिया.

**विषयः**–उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) फेब्रुवारी / मार्च 2024 करीता अंतर्गत , बहिर्गत (प्रात्याक्षिक ) परिक्षक / समिक्षक यांचे विषय निहाय शिक्षकांची माहिती अद्यावत करणेबाबत.

**संदर्भः**– नाविम / गोउमा / 3003,नागपूर दि.30 / 08 / 2023 अन्वये

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की,उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी) फेब्रुवारी / मार्च 2024 करीता लिखित उत्तरपत्रिका मुल्यांकनासाठी तसेच प्रात्याक्षिक विषयांचे अंतगर्त व बहिर्गत शिक्षकांची सर्व विषय निहाय माहिती मंडळ कार्यालयात दि. 28 / 09 / 2023 पर्यंत हस्तपोच किंवा टपालाव्दारे संदर्भिय पत्रानुसार मागविण्यात आलेली होती.

तथापी, भंडारा, चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली व गोंदिया या जिल्हातील कनिष्ठ महाविद्यालयांची सर्व शिक्षकांची माहीती (पॅनल फॉर्म )अद्याप पर्यंत अप्राप्त आहे. तसेच ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलली शिक्षकांची माहिती विषयनिहाय अपूर्ण सादर केलेली आहे. अशा शिक्षकांची विषयनिहाय यादी अद्यावत करण्यात व इयत्ता 12 वी परीक्षा 2024 च्या लिखीत उत्तरपत्रिका मूल्यांकन करण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहे. परीक्षेचे काम कालमर्यादीत स्वरुपाचे व तातडीचे असल्याने सर्व कनिष्ठ महाविद्यालयाने मंडळास सहकार्य करणे अपेक्षित आहे.

तरी अद्याप पर्यंत ज्या कनिष्ठ महाविद्यालयाने इ.12 वी विषय शिक्षकांचे पॅनेल फॉर्म पाठविले नाही व ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी अपूर्ण माहिती सादर केलेली आहे त्यांनी त्वरित मंडळ कार्यालयात हस्तपोच किंवा उलटटपाली माहिती पाठविण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे जेणे करुन परीक्षेच्या उत्तरपत्रिका मूल्यांकनाच्या कामात अडचण निर्माण होणार नाही.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रतीलिपी** :–
01) प्राचार्य, सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये, भंडारा, चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली व गोंदिया यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.